# इंटरनेटच्या माध्यमातून सामाजिक - वैचारिक सक्रियता

## दिशादर्शन शिबिर

## दिनांक : १, २ ऑगस्ट , २००९

## अहवाल

रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीच्या वतीने प्रथमच इंटरनेट सारख्या आधुनिक तंत्राबद्दल सामाजिक संस्थांचे, संघटनांचे, प्रचार प्रसिद्धी विषयांशी संबंधित कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांसाठी "**इंटरनेटच्या माध्यमातून सामाजिक - वैचारिक सक्रियता**" दिशादर्शन  शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

दि. १-२ ऑगस्ट या दोन दिवसीय शिबिरात महाराष्ट्रातील १५ संस्थांतून २२ प्रतिनिधी आणि वैयक्तिक २ असे एकूण २४ (२१ पुरुष, ३ महिला) प्रतिनिधी सहभागी झाले होते.

आज इंटरनेटचे माध्यम सर्वांसाठी सहज उपलब्ध आणि तुलनात्मक दृष्टया कमी खर्चिक असून अद्यापतरी त्यावर कुणाचीही मक्तेदारी नाही. म्हणजेच या माध्यमाचे खऱ्या अर्थाने लोकशाहीकरण झालेले आहे, असे हे माध्यम आपले विचार प्रभावीपणे मांडण्यासाठी कसे वापरावे आज वेगवेगळ्या / विभिन्न विचारसरणीची माणसे कशा पद्धतीने या सर्वांचा वापर करतात, आपणही तो कसा चांगल्या पद्धतीने वापर करावा या बाबतचे मार्गदर्शन शिबिरात करण्यात आले.

या शिबिराचे उद्घाटन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे कोकण प्रांत सहप्रचारक श्री. रवींद्र किरकोळे यांनी केले. आपल्या उद्घाटनपर संबोधनात ते म्हणाले की इंटरनेट हे अत्यंत प्रभावी साधन अधिकाधिक मानव उपयोगी कसे करता येईल ? यावर लक्षकेंद्रीत केले पाहिजे तसेच सोनीच्या जाहिरातीमध्ये हिंदू देवतेचा अपमान करण्यात आला होता या विरोधात अवघ्या साडेतीन तासात या माध्यमाद्वारेचे आंदोलन कसे केले गेले आणि सोनीला ती जाहिरात मागे घ्यावे लागली हे उदाहरणही दिले.

पहिले सत्र माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात स्वतःची सल्ला देणारी वैनतेय सॉफ्टवेअर कन्सल्टंसी चालविणारी श्रीयुत शंशाक टिळक यांनी "इंटरनेटचे मूलभूत तंत्रज्ञान " हे सत्र घेतले. प्रथम इंटरनेट म्हणजे नेमकं काय ? कशा पद्धतीने त्याचे काम चालते ? हा तांत्रिक भाग अगदी सोपा करुन मांडला आणि इंटरनेटसंबंधी पायाभूत माहिती दिली, त्याचबरोबर इंटरनेटच्या एकूण प्रवासाचा आढावा घेतला.

यानंतर "इंटरनेटच्या माध्यमातून वैचारिक सक्रियतेची आजची स्थिती " या विषयावर विश्व संवाद केंद्राचे संस्थापकीय विश्वस्त तसेच विश्व अध्ययन केंद्राचे संस्थापकिय सचिव श्री. रतन शारदा यांनी या विषयावर मार्गदर्शन केले. त्यांनी आज विविध विचारप्रणाली मार्फत इंटरनेटवर कशा प्रकारचे कार्य सुरु आहे आणि विविध संकेतस्थळावर कसे सुरु आहे ते सादरीकरणातून मांडले.

यानंतर प्रबोधिनीचे महासंचालक डॉ. विनय सहस्रबुद्धे यांनी "इंटरनेटच्या माध्यमातून सैद्धांतिक लढ्याची पूर्वतयारी "हे सत्र घेतले. या मध्ये इंटरनेट हे एकट्याने लढण्याचे सर्वात प्रभावी माध्यम

आहे हे स्पष्ट केले. इंटरनेट व्यतिरिक्त लढ्यामध्ये लागणारी जोडीदाराची गरज येथे नाही हे माध्यम आळस झटकून आत्मविश्वासाने कसे वापरावे हे सांगितले. या बरोबरच प्रत्यक्ष कार्यक्षेत्रात काम करण्याला हा लढा पर्याय नाही तर पूरक आहे, प्रत्यक्ष समाजात मिसळून काम करणे हे ही अत्यंत महत्त्वाचे आहे असेही प्रतिपादन केले.

दुसऱ्या दिवशीच्या पहिल्या सत्रात प्रथम श्री.ऋषीकेष शिंदे या सहभागीने आदल्या दिवशीच्या सत्राची थोडक्यात उजळणी केली. यानंतर सॉफ्टवेअर अभियंता म्हणून प्रदीर्घ अनुभवी श्री. समीर जोगळेकर यांनी "सामाजिक संकेत स्थळांची विविधता" या विषयावर विस्तृत विवेचन केले. कोणकोणत्या संकेतस्थळांना आवर्जुन भेट दिली पाहिजे, कोणत्या सर्च इंजिनवर कसा शोध घ्यावा, अधिकाधिक प्रभावीपणे या सर्व उपलब्ध साधनांचा आपले विचार प्रभावीपणे मांडण्यासाठी आपल्या सामाजिक कामात कसा उपयोग करता येईल, तसेच विविध प्रकल्पांसाठी या माध्यमातून माणसे कशी जोडावीत, कशी सांभाळून ठेवावीत या संबधी मार्गदर्शन केले.

या नंतरच्या सत्रात आदिवासी समाजात कार्याचा अनुभव असलेले, पत्रकारिता क्षेत्रात कार्यरत व त्याबरोबर विकास संवाद व अभिलेख सल्लागार म्हणून कार्यरत असलेले श्री. मिलिंद थत्ते यांनी ".आशय निर्माण कुशलता" या विषयावर मार्गदर्शन केले. यामध्ये एखादा विचार स्पष्टपणे मांडताना कोणकोणती कौशल्य हस्तगत करावीत यासंबंधीची माहिती सहभागींनाच विचार करण्यास प्रवृत्त केले. त्यानंतर त्यात भर घालून ती यादी पूर्ण केली.

सर्वांना उत्सुकता असलेले सत्र म्हणजेच "How to create Blog". हा विषय प्रबोधिनीचे कार्यकारी अधिकारी-संशोधन विभाग श्री. मिलिंद आरोलकर यांनी प्रात्याक्षिकाद्वारे मांडला. त्यांनी आपल्या सत्रात ब्लॉग कसा तयार करावा, त्यामध्ये माहिती, छायाचित्रीकरण कसे द्यावे. प्रश्नांच्या सहभागींनी या सत्रात भरपूर प्रश्न विचारले अन आपले समाधान करुन घेतले.

शिबिराच्या समारोप सत्रात प्रथम कार्यक्रम अधिकारी मिलिंद बेटावतकर यांनी सहभागी प्रतिनिधींचा संख्यात्मक आढावा मांडून त्यानंतर प्रबोधिनीच्या कार्यकारी संचालक रवीन्द्र साठे यांनी दोन दिवसीय शिबिरातील अभ्यासक्रमाची पूर्तता, अपेक्षा, संकल्पना, अडचणी आणि व्यवस्थात्मक सूचना, सहभागींच्या कडून व्यक्त करुन घेतल्या तसेच अशा प्रकारचा पहिल्याच कार्यक्रमाच्या सहभागाबद्दल प्रबोधिनीच्यावतीने कृतज्ञता व्यक्त केली.

समारोप सत्राचे प्रमुख अतिथी साप्ताहिक विवेकचे प्रबंध संपादक मा. श्री. दिलीप करंबेळकर यांच्या हस्ते प्रातिनिधीक स्वरुपात सहभागींना प्रमाणपत्र वितरण करण्यात आले तसेच त्यांनी समारोप भाषणात जगाच्या इतिहासाच्या पार्श्वभूमीवर यापूर्वी झालेल्या सर्व घटना पाहता, संपूर्ण जगाला मानवतेच्या उदांत्त विचार सरणीची ओळख करुन देण्यासाठी इंटरनेटचा वापर कसा करावा या बद्दल विवेचन केले.

पसायदानाने शिबिराची सांगता झाली.